# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक १०/०४/२०१७

## नाडेकल येथे पोलीस-नक्षल चकमक

- **घटनास्थळावरुन रायफलसह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त**

गावामध्ये नक्षल असल्याच्या मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे काल दिनांक ०९/०४/२०१७ रोजी उपविभाग कुरखेडा अंतर्गत पोमके कोटगुल हद्दीत येणाऱ्या मौजा नाडेकल गावाशेजारी मा. अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. महेश्वर रेड्डी व विशेष अभियान पथक गडचिरोली नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना रात्री १०.३० ते ११.०० वा. च्या दरम्यान पोलीस-नक्षल चकमक झाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी आपल्या जवळील साहित्य घटनास्थळीच टाकून अंधार व जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

दरम्यान चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पोलीसांनी घटनास्थळावरुन नक्षली साहित्य ०१ एस.एल.आर. रायफल, एक १२ बोर रायफल, ०१ एस.एल.आर. मॅग्झीन, ०२ एके रायफल मॅग्झीन, १६ नग एस.एल.आर. जिवंत काडतुस, दोन नग १२ बोर काडतुस, एक क्लेमोर माईन, ०२ पिट्टु, लोखंडी खिळे, मेडीसीन व लिखीत साहित्य तसेच रोजच्या दैनंदिन वापराचे मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त केले आहे.

नक्षलवादयांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.

